# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि/263 /2020 दिनांक:30 / 04/2020

वाचा – 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा – 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 242 /2020 दिनांक 14.04.2020
7. फौजदारी प्रक्रिया संहिता – 1973
8. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 30 एप्रिल 2020

अकोला जिल्हयातून इतर राज्यात/जिल्हयात पर्यटक, विद्यार्थी, यात्रेकरु, कामगार व इतर यांना जाण्याकरिता

## *अधिसूचना*

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार *दिनांक* 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमुळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये **दिनांक** 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता **सिमाबंदी व संचारबंदी** लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 30 एप्रिल 2020 चे आदेशाद्वारे संचारबंदी बाबत अतिरिक्त मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली आहेत. अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्याचे दृष्टीने विविध आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 मधील तरतुदीनुसार संचारबंदी बाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

**त्याअर्थी**, मी **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचना व महाराष्ट्र शासन यांचे दिनांक 30 एप्रिल 2020 चे आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकरानुसार लॉकडाऊनमुळे स्थलांतरित कामगार, यात्रेकरू, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणी अडकलेले आहेत त्यांना **दिनांक 1 मे 2020** पासून खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार हलविण्यास परवानगी दिली जाईल.

1. अकोला जिल्हयात अडकुन पडलेले कोणत्याही प्रकारचे नागरीक यांना अकोला जिल्हयातून पास देण्यात येईल. त्यासाठी त्यांना ऑनलाईन अर्ज करावा लागेल.
2. अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबधीतास ज्या जिल्हयामध्ये जायाचे आहे त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्याकडे ~~अर्ज~~ त्यांचे नावाची यादी पाठविण्यात येईल. त्यांच्याकडुन **परिशिष्ट 'ब'** मध्ये नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधीतास वाहतुक पास देण्यात येईल.
3. अकोला जिल्हयातील बाहेर जिल्हयात अडकून असणा-या नागरींकानी ज्या जिल्हयामध्ये अडकून पडले आहे तेथील जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावा.

..2..

NitinN 355

4. जिल्हाधिकारी अकोला यांचे **परिशिष्ट 'ब'** मागणी करण्यासाठी संबधीत जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना पाठविण्यास सांगावे.
5. संबधीत जिल्हाधिकारी यांचेकडून जिल्हाधिकारी अकोला यांना **ना हरकत प्रमाणपत्र** मागवीण्यात आल्यास त्यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.
6. संबधीत जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कडुन अर्जदारास परवानगी देण्यात येणार असल्यामुळे बाहेर जिल्हयात अडकुन पडलेल्या नागरीकांनी संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा.
7. सबंधीत अर्जदार यांचे **परिशिष्ट ब** मागणी करीता या जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधीतास पास देण्यात येईल तो पर्यंत पासेसची मागणी करु नये.
8. संबंधीत व्यक्तीस (पास) परवानगी मिळण्यापूर्वी वैद्यकिय तपासणी करणे बंधनकारक राहील. अर्जदार यांनी वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.
9. ज्या क्षेत्रास प्रतिबंधीत क्षेत्र ( Containtment Zone) म्हणून घोषीत केले आहे. अशा क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीस – परवानगी देण्यात येणार नाही.

* वैधकीय / अंतिमसंस्कार या कारणा व्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी

10. ज्या व्यक्तीस परवानगी (पास) देण्यात आली आहे, त्याच व्यक्तीने सदर परवानगी (पास) चा वापर करावा. गैरवापर झाला असल्याचे आढळून आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
11. अकोला जिल्हयात बाहेरील जिल्हयातून प्रवेश केलेल्या नागरीकांची वैद्यकिय तपासणी करणे बंधनकारक राहील. तसेच वैद्यकिय तपासणी केल्यानंतर 14 दिवसअलगीकरण ( Home Quarantine) राहणे बंधनकारक आहे.
12. अकोला जिल्हयात आलेल्या प्रवासी नागरीकांनी त्यांची माहिती स्थानिक स्वराज्य संस्था, महानगर पालिका क्षेत्राकरिता – आयुक्त व नगर पालिका क्षेत्राकरिता – मुख्याधिकारी यांचेकडे देणे बंधनकारक राहील.
13. संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था यांनी संबधीत व्यक्तीला उपविभागीय दंडाधिकारी यांनी काढलेल्या कलम 144 नुसार अलगीकरणाचे आदेश निर्गमित करावे.

सदर अधिसूचना आज **दिनांक 30 एप्रिल 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी, अकोला

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक,अकोला यांनी उपविभागीय अधिकारी, अकोला यांना माहिती करिता.
3. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. अधीष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला. यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
5. जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय अकोला. यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
7. उपविभागीय अधिकारी --------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. तहसिलदार अकोला-------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

जिल्हादंडाधिकारी, अकोला
जिल्हादंडाधिकारी, अकोला